पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/०६/कावि/735 /२०२०
दिनांक :- 07/07/२०२०

विषय : मा.महापालिका सभा ठराव क्र.५४८ दि.०१/०६/२०२० अन्वये सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकास दिलेल्या मान्यतेबाबत

**परिपत्रक,**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९६ अन्वये मा.स्थायी समितीने मान्य केलेले सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक मा.महापालिका सभेपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवणेत आलेले होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०० ला अनुसरून मा.महापालिका सभा ठराव क्र.५४८ दि.०१/०६/२०२० अन्वये मा.महापालिका सभेने सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक अ,क व प तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांचे अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व म.न.पा. हिस्सा या बाबतचे अंदाजपत्रकावर चर्चा करून अंदाजपत्रकास अंतिम मान्यता दिलेली आहे. सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक मनपाच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर टाकणेत आलेले आहे.

सर्व संबंधीत विभागप्रमुखांनी अंदाजपत्रकीय तरतूदींबाबत लेखा विभागाकडील परिपत्रक क्र.लेखा/०६/कावि/०६/२०२० दि.२९/०५/२०२० अन्वये सुचविलेल्या उपाय योजनांप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रत:-

१) सर्व विभाग
२) सर्व क्षेत्रिय कार्यालये
३) मा.आयुक्त कक्ष व मा.अति.आयुक्त कक्ष यांना माहितीसाठी सविनय सादर.